राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत, लाभार्थी सामावून घेण्याकरीता कालमर्यादेत बदल करुन पात्र लाभार्थ्यांसाठी दि. ३०.६.२०१९ पर्यंतची कालमर्यादा ठेवण्याबाबत.
(Cut off Date दि. ३०.६.२०१९ करण्याबाबत)

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः असुका २०१९/प्र.क्र.४९/नापु-२२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ६ जुलै, २०१९

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय क्रमांक असुका २०१३/प्र.क्र. ३१९/नापु-२२, दि. १७ डिसेंबर, २०१३.
२) शासन निर्णय क्रमांक असुका २०१४/प्र.क्र. ११६/नापु-२२, दि. २४ मार्च, २०१५.
३) शासन निर्णय क्रमांक अधापु २०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दि. २४ जुलै, २०१५.
४) शासन निर्णय क्रमांक अधापु २०१४/प्र.क्र.१२२/नापु-२२, दि. १५ जानेवारी, २०१६.
५) शासन शुध्दीपत्रक क्रमांक अधापु २०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दि.११ जुलै, २०१६.
६) शासन निर्णय असुका २०१६/प्र.क्र.१२५/नापु-२२, दि.१३ ऑक्टोबर, २०१६.
७) शासन निर्णय असुका २०१७/प्र.क्र.६०/नापु-२२, दि.३ मार्च, २०१७.
८) शासन निर्णय असुका २०१८/प्र.क्र.१/नापु-२२, दि. २१ मे, २०१८.
९) शासन निर्णय असुका २०१८/प्र.क्र.१३२/नापु-२२, दि. १६ नोव्हेंबर, २०१८.
१०) शासन निर्णय असुका २०१८/प्र.क्र.४९/नापु-२२, दि. २२ फेब्रुवारी, २०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३, दिनांक ५ जुलै, २०१३ पासून लागू केला आहे. सदर अधिनियमानुसार राज्यासाठी ७६.३२ टक्के ग्रामीण (४६९.७१ लक्ष) व ४५.३४ टक्के शहरी (२३०.४५ लक्ष) अशी मिळून ७००.१६ लक्ष लाभार्थी संख्या निश्चित करण्यात आली आहे. सदर अधिनियमाची अंमलबजावणी राज्यात दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ पासून करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता प्रथमत: संदर्भाधीन दिनांक १७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण व शहरी भागाकरिता जिल्हानिहाय लाभार्थ्यांचा इष्टांक देण्यात आला असून तद्नंतर संदर्भाधीन दि. २४.३.२०१५, दि. १३.१०.२०१६, दि. ३.३.२०१७ व दि. १६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वंये वेळोवेळी सुधारीत जिल्हानिहाय इष्टांक देण्यात आला आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये जास्तीत जास्त लाभार्थ्यांचा समावेश होण्याच्या दृष्टीने दिनांक २२.२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १५.२.२०१९ पर्यंतच्या शिधापत्रिकांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु सदर सुधारीत कालमर्यादेनंतर देखील दि. १६.११.२०१८ अन्वये दिलेल्या सुधारीत इष्टांकाची पूर्ती होत नसल्याचे दिसून आल्याने दि. ३०.६.२०१९ पर्यंतच्या पात्र शिधापत्रिकाधारकांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

<u>शासन निर्णय :-</u>

दि. १६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या इष्टांकाची पूर्ती होण्याच्या दृष्टीने दि. २२.२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेल्या निर्णयामध्ये बदल करण्यात येत असून यापुढे राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये सवलतीच्या दराने अन्नधान्य मिळण्याकरिता नवीन पात्र लाभार्थ्यांची निवड करताना **दि. १५.२.२०१९ च्या ऐवजी दि. ३०.६.२०१९ पर्यंतच्या योग्य व गरजू असलेल्या पात्र शिधापत्रिकाधारकांचा विचार करण्यात यावा**.

संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता दिलेल्या इतर सर्व सूचना कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०६१२०६२३१८०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHESH PATHAK

Digitally signed by MAHESH PATHAK
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=e9535c95dc1a6714290a6a1e084b3bb4cc266f737f88ea4b79e3f83c4a7ca12d, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=89b136784be463271bbba2095dbd148bf1e0f6a85adaff8cf4665692d20f2e76, ou=FOOD CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MAHESH PATHAK
Date: 2019.07.06 12:09:57 +05'30'

(महेश पाठक)
शासनाचे प्रधान सचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्रालयीन विभाग
४. सर्व विभागीय आयुक्त,
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
७. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
८. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
९. सर्व उपायुक्त (पुरवठा)
१०. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
११. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
१२. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
१३. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
१४. सर्व अधिकारी (सचिव वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१५. सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१६. सर्व खाजगी सचिव, मा. मंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
१७. सर्व खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१९. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधानभवन, मुंबई
२०. सर्व विधान परिषद सदस्य व विधानसभा सदस्य.
२१. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
२२. निवडनस्ती (कार्यासन नापु-२२).